

डावपेच यशस्वी गुंतवणुकीचे..!

प्रणवदा, अजब तुमचे सरकार!



# अमृतवेल मनी प्लस

April 2012 / ₹ : 30/-

www.amrutwelplus.com





| इनसाईड View |

# ऊर्जा... विचाराची अन विकासाची!

12

## बी-गुरूंच्या नजरेतून कृषी व्यवसाय...

18



- बेस्ट बँक्स ....................................पान ६
- मला सचिन व्हायचंय.. ......................पान ८
- बजेट...............................................पान २२
- डावपेच यशस्वी गुंतवणुकीचे..! ............पान २८
- ठेवींचा ठेवा.... ...................................पान ३१
- सन्मानाने जगा, अधिकार जाणून घ्या... .पान ३५
- अक्षय्य तृतीया ..................................पान ३६
- परदेशी जाताना विमा कवच हवेच! .......पान ४२
- प्रतीक्षा निकालांची ............................पान ४६
- टेक्नो शेअर्स.......................................पान ५०
- न्यूज प्लस ..........................................पान ५६
- ॲक्रॉस वर्ल्ड, राशीभविष्य व इतर




22

### अर्थसंकल्प

काहीसं विकृत विश्लेषण



41

अन्यथा

### ३०-३५ टक्के लोक उद्योग सोडतील!

# ऊर्जा... विचारांची अन् विकासाची!

दक्षिण आफ्रिकेच्या नेल्सन मंडेलांपासून, ते अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामांपर्यंत अनेकांचं प्रेरणास्थान असलेले महात्मा गांधी... गांधीविचारांनी आजवर अनेकांचं आयुष्य बदलून टाकलंय. जैन इरिगेशनचे संस्थापक भंवरलाल जैन यांचं प्रेरणास्थानही गांधीजीच आहेत.. भाऊंनी आपल्या विचारांची ही ऊर्जा निसर्गपूरक विकासाच्या ऊर्जेत परावर्तित केली. शेतकरी आणि गोरगरिबांच्या विकासासाठी झटत असतानाच त्यांनी भावी पिढीला गांधीविचार देण्यासाठी जळगावच्या जैन हिल्सवर गांधी रिसर्च फाऊंडेशनची भव्य वास्तू साकारली आहे. या वास्तूत अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि गांधींजींचं विचारधन यांचं उत्कृष्ट फ्युजन इथं बघायला मिळेल...

धर्मेंद्र पवार/अमोल परांजपे
editor@amrutwelplus.com

The light has gone out, I said, and yet I was wrong. For the light that shone in this country was no ordinary light. The light that has illumined this country for these many years will illumine this country for many more years...

- Pandit Jawaharlal Neharu

प्रकाश निघून गेला, असं मी म्हणालो... तसं हे चुकीचं आहे. या देशाला उजळून टाकणारा हा प्रकाश सर्वसामान्य खचितच नाही. या प्रकाशानं गेली अनेक वर्षं हा देश प्रकाशमान केला आणि पुढच्या हजारो वर्षांमध्ये तो असाच प्रकाश देत राहील...

– पंडित जवाहरलाल नेहरू

बापू आपल्याला सोडून गेल्याचं दुःखद वर्तमान देशबांधवांना सांगताना पंडितजींनी उच्चारलेले हे शब्द... गांधीजींच्या विचारांचा हा प्रकाश भावी पिढ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी जैन इरिगेशनच्या जळगावमधील कॅम्पसमध्ये एक भव्य वास्तू साकारली आहे... गांधी रिसर्च फाऊंडेशन... या वास्तूच्या उभारणीपासून ते आतमध्ये असलेल्या अत्याधुनिक प्रदर्शनीपर्यंत, प्रत्येक गोष्टीवर सखोल विचार केला गेल्याचं पदोपदी जाणवतं...

गांधी रिसर्च फाऊंडेशन अर्थात जीआरएफमध्ये प्रवेश करताच समोर दिसतो तो प्रार्थनेला बसलेल्या गांधीजींचा पुतळा... या पुतळ्यासमोरच २००–२५० जण बसू शकतील असं एक ॲम्फी थिएटर आहे. याचं वैशिष्ट्य म्हणजे इथं



बसायला खुर्च्या नाहीत... स्वच्छ लाल दगडाची फरशी अन् त्याच्या अवतीभवती हिरव्या गवताची छान रजई इथं आहे. गांधीजी दिवसाची सुरुवात आणि दिवसाची अखेर प्रार्थनेनं करत असत... गांधींच्या जीवनावर अभ्यास करणाऱ्यांनी इथं अशीच प्रार्थना करावी, हा या ॲम्पी थिएटरमागचा हेतू आहे. मुख्य इमारतीमध्ये प्रवेश करताच पहिल्या सभागृहात वासुदेव कामत यांनी चितारलेली चार भव्य कोलाज पेंटिंग्ज दिसतात. गांधीजींच्या आयुष्यातले मुख्य चार कालखंड, म्हणजे त्यांचं बालपण, महाविद्यालयीन शिक्षणासाठी ब्रिटनमध्ये घालवलेला काळ, दक्षिण आफ्रिकेतील कारकीर्द आणि भारताचा स्वातंत्र्यलढा, हे प्रसंग एकाच वेळी आपल्या नजरेखालून जातात. समोर एका वासराला खेळवणाऱ्या बापूंचा सुंदर ब्रान्झ पुतळा आहे... हे दालन पार केल्यानंतर सुरू होते ती गांधीजींच्या प्रकाशवाटांवरून आपली सफर... माझं आयुष्य हीच माझी शिकवण आहे, असं गांधीजी म्हणत. त्यालाच अनुसरून जीआरएफमधला गांधीविचारांचा ठेवा त्यांच्या जीवनाच्या अभ्यासातून घ्यायचा आहे.

गांधीजींचे विचार मांडताना ते नव्या पिढीपर्यंत पोहोचावेत असं वाटत असेल, तर अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याशिवाय गत्यंतर नाही... केवळ चित्रमय प्रदर्शनांमधून मांडलेले गांधीजी कदाचित नव्या पिढीला समजणारच नाहीत आणि आजच्या काळात गांधी विचारांचं महत्त्व का आहे, हेदेखील समजणार नाही... त्यामुळेच गांधीजींच्या आयुष्याची आणि शिकवणींची जीआरएफमधली ही शिदोरी बांधली आहे ती विज्ञान-तंत्रज्ञानाच्या वस्त्रात...

जीआरएफमधल्या प्रदर्शनीमध्ये तुमच्यासाठी वेगळा गाईड असणार नाही... तुम्ही स्वतःच तुमचे मार्गदर्शक असाल आणि तुमच्या मदतीला असेल ऑडिओ गाईड हे डिव्हाईस... इयरफोन

आणि एक पॅनल तुम्हाला प्रवेशावेळी दिलं जाईल. प्रदर्शनाच्या प्रत्येक टप्प्याला एक विशिष्ट कोड देण्यात आला आहे. दालनात दर्शवलेला हा कोड ऑडिओ डिव्हाईसवर फीड केल्यानंतर त्याच्याशी संबंधित माहिती हेडफोनद्वारे तुमच्या कानात उतरेल.

प्रदर्शनाच्या पहिल्या टप्प्यात एका व्हिडिओद्वारे भंवरलाल जैन गांधी रिसर्च फाऊंडेशनचं व्हिजन, मिशन आणि पार्श्वभूमी विषद करतात. पुढचं दालन आहे ते स्वतःची परीक्षा घेणारं... टचस्क्रीनच्या मदतीनं इथं एक ऑप्टिट्यूड टेस्ट घेतली जाते. ही परीक्षा तसं म्हटलं तर सोपी, म्हटलं तर कठीणही. तुम्हाला खायला काय आवडतं, गाडी कोणती आवडते, कपडे कसे आवडतात यासारख्या सोप्या प्रश्नांची सोपीच उत्तरं... पण त्यामुळे यापुढे गांधीजींचं आयुष्य 'अभ्यासताना' आपण किती पाण्यात आहोत हे आपल्या ध्यानात राहणार आहे...

इथंपर्यंतचं वर्णन करणं सोपं होतं... लिखाणाची खरी परीक्षा यापुढेच आहे. कारण तिथं जे आहे, ते शब्दातीत आहे. शब्द अपुरे पडण्याची धास्ती आहे. सुरुवातीला छोट्या मोहनदासचं जीवन कसं होतं, त्यांचे आई-वडील – पुतळीबाई आणि करमचंद – यांची माहिती, आईचा देवभोळेपणा आदी गोष्टी फोटोंच्या माध्यमातून हळूवार उलगडत जातात. याच्या मदतीला जुन्या काळी यात्रेत आढळणाऱ्या बायोस्कोपची जोड दिली आहे. फरक एवढाच या बायोस्कोपमध्ये एलडी अन् त्यात बापूंच्या लहानपणीचा माहितीपट मनात घर करून बसतो. नंतरच्या दालनात गांधीजींनी तरुणपणी घेतलेले अनुभव लेझरच्या मदतीनं दिसतात. अर्थातच आपल्या सोबतीला यावेळी ऑडिओ गाईड असतो आणि तो सगळी माहिती देत असतोच... पुढे गेल्यावर आपण जातो ते थेट गांधीजींच्या लंडनमधल्या खोलीत... त्यांचं अभ्यासाचं डेस्क, शेकोटी, स्वयंपाकाचं टेबल असं सगळं जसंच्या तसं साकारलेलं... आपण नकळतच स्वातंत्र्यपूर्व काळातल्या त्या राणीच्या देशात पोहोचतो.

गांधीजींचं सार्वजनिक आयुष्य खऱ्या अर्थानं सुरू झालं ते दक्षिण आफ्रिकेत गेल्यावर... तिथल्या भारतीय आणि कृष्णवर्णीय मजुरांचे हाल बघून त्यांचं देवभोळं मन उद्विग्न झालं नसतं तरच नवल. कायमची दुय्यम वागणूक, हालअपेष्टा, गोऱ्या राज्यकर्त्यांचा जुलूम याविरुद्ध त्यांनी आपल्या कृष्णवर्णीय बांधवांना एकत्र केलं. बॅरिस्टर म्हणून त्यांची बाजू मांडली. त्यांना अहिंसक लढा द्यायला शिकवलं... हा काळ पुढच्या दालनांमध्ये सजीव होतो... थ्री डी इफेक्ट वापरून गोऱ्यांच्या डब्यातून गांधींना .... फलाटावर फेकणारा गोरा आपल्याला दिसतो.

भारतीय इतिहासातला काळा दिवस ठरलेली जालियनवाला बाग हत्याकांडाची घटना एका सुंदर शिल्पाच्या सहाय्यानं साकारली आहे. आक्रोश करणारे

## गांधी रिसर्च फाऊंडेशन

**मिशन :** गांधीजींनी दिलेली मूल्यं समाजात रुजवणे आणि सत्य, अहिंसा, शांती व परस्पर सहकार्याची भावना वैश्विक स्तरावर विकसित करणे.

**व्हिजन :** गांधीजींचे जीवन, विचार आणि कार्याची भावी पिढीला ओळख करून देणे.



**सहा वर्षांपूर्वी** मणिभवनमध्ये असताना गांधीजींचे विचार अमर करण्याच्या आपल्या इच्छापूर्तीचा क्षण जवळ आल्याचं जाणवलं आणि मग साबरमती, वर्धा, दिल्ली यासह देशभर फिरून गांधीजींच्या जीवनाशी संबंधित प्रत्येक गोष्टीचं अवलोकन सुरू केलं. त्यांच्यावरचं साहित्य विकत घ्यायला सुरुवात केली... तुम्ही गांधीतीर्थावर याल तेव्हा मनात काहीच घेऊन येऊ नका. इथे तुम्ही जो अनुभव घ्याल, तो सोबत घेऊन जा! जगात जसजशी हिंसा, लालच आणि ऐहिक प्रवृत्ती वाढतील, तसतशी गांधीविचारांची जास्तीत जास्त गरज निर्माण होईल... त्यावेळी या विचारांना प्रसारित करणारं एक केंद्र असावं, हा गांधीतीर्थ आणि गांधी रिसर्च फाऊंडेशनमागील हेतू आहे...

**– भंवरलाल जैन,** संस्थापक, जीआरएफ





**ब्राह्मणांच्या हाती** झाडू आणि वाल्मिकींच्या हाती भगवद्गीता आली, तर समाजातील जाती-पातींची अनिष्ट प्रथा मोडेल, असं गांधीजी सांगत... त्यांनी आर्थिक विषमता दूर करण्यासाठी चरखा आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी झाडू ही प्रतीकं मानली होती... मी देशभरात फिरताना तरुणांना आणि विद्यार्थ्यांना भेटत असतो. गांधीजी समजून घेण्याची इच्छा, आकांक्षा आणि भूक त्यांच्यामध्ये मला दिसते... गांधीतीर्थ आणि गांधी रिसर्च फाऊंडेशन हे गांधीविचार आणि त्यांच्या आचारांचं आंतरराष्ट्रीय प्रक्षेपण केंद्र होईल, याची खात्री आम्हाला आहे...

– **न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी**, अध्यक्ष, जीआरएफ



**आदरणीय भाऊंनी** महात्मा गांधींच्या विचारांनी प्रेरित होऊनच आपली कारकीर्द सुरू केली आणि यावेळी त्यांनी घेतलेल्या अनुभवांना गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या माध्यमातून मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे... यामध्ये त्यांनी आयुष्यभर केलेल्या चिंतनाचं संचित ओतलं आहे. हे करत असताना जागतिक दृष्टिकोन बाळगून हे गांधीतीर्थ जगाच्या नकाशावर असावं, यासाठी त्यांचा प्रयत्न आहे. जगभरातल्या गांधीवादींनी हे कार्य आपलं मानलं आणि त्याला सर्वतोपरी मदत केली, म्हणूनच हे उभं राहू शकलं...

– **अशोक जैन**, संचालक, जीआरएफ

## तंत्रज्ञानाची जादू...

जीआरएफमधल्या प्रदर्शनीमध्ये प्रकर्षानं जाणवणारी गोष्ट म्हणजे छायाचित्रांचा विपुल आणि परिणामकारक वापर... प्रत्येक दालनामध्ये आपल्याला त्या काळाशी आणि विषयाशी संबंधित असलेली अनेक छायाचित्रं बघता येतात. महत्त्वाची गोष्ट म्हणजे इतक्या जुन्या काळातल्या या छायाचित्रांवर प्रचंड मेहनत घेण्यात आल्याचं स्पष्ट जाणवतं... प्रत्येक फोटोमधले बारकावे नीट दिसावेत, या हेतूने त्यावर तंत्रज्ञांनी अपार कष्ट घेतले आहेत. त्यामुळे एकीकडे दृक्‌श्राव्य माध्यमातून आपल्यासमोर उलगडत जाणारा गांधीजींचा इतिहास चित्रमय रूपानंही आपल्या भेटीला येत राहतो... त्या काळातली कागदपत्रं, जुने दस्तावेज, वर्तमानपत्रातली कात्रणं आदी छापील मजकूरही जास्तीत जास्त वाचनीय व्हावा, यासाठी तंत्रज्ञानाची मदत घेण्यात आली आहे... त्या काळातले हे छापील पुरावे हायटेक साज चढवून आल्यामुळे अधिकच आपले वाटतात...

## गांधीविचारांची ग्रंथगाथा

कोणत्याही अभ्यासाचा गाभा हा साहित्यात असतो... त्यामुळे अर्थातच गांधी रिसर्च फाऊंडेशनमध्ये असलेलं वाचनालयही तितकंच सुसज्ज बनविण्यात आलं आहे. इथं अर्थातच गांधीजींवर उपलब्ध असलेली सगळी साहित्यसंपदा आहेच; पण पूर्वीच्या अनेक दुर्मीळ ग्रंथांच्या डिजिटल प्रती इथं तयार करण्यात आल्या आहेत. हे काम अर्थातच न संपणारं आहे. जसजसे ग्रंथ मिळत जातील, तसतशी त्यांची पानं मेगाबाईट-गिगाबाईटमध्ये विणली जाणार आहेत...





**माझी जन्मभूमी** व कर्मभूमी असलेल्या जळगावमध्ये गांधीजींचं हे भव्य स्मारक स्थापन झाल्याचा मला अभिमान आहे. यासाठी भंवरलालजी जैन यांनी सर्वस्व पणाला लावून हे केंद्र उभे केले. याचे जास्त समाधान आहे. गांधीजी हे केवळ एक व्यक्ती नव्हते, तर शक्ती होते... गांधीजींना समजून घेणंच पुरेसं नाही, तर त्यांची शिकवण समजून घेणं आजच्या पिढीला आवश्यक झालं आहे. तरुणांनी गांधीजी नीट समजून घेतले तर या नव्या पिढीला एक चांगला दृष्टिकोन आणि दिशा मिळू शकेल...

**– राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील**

*(जीआरएफ लोकार्पण सोहळ्यात व्यक्त केलेले विचार)*



**राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते 'गांधीतीर्थ'चे लोकार्पण झाले. यावेळी राष्ट्रपतींचा सत्कार करताना भंवरलाल जैन आणि जीआरएफचे अध्यक्ष न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी.**

लोक, गोळ्या झाडायचे आदेश देणारा क्रूरकर्मा जनरल डायर, जीव वाचवण्यासाठी विहिरीत उड्या मारणारे बायाबापडे... कोणाही देशभक्ताचं मन खिन्न करणारी पण तितकंच रक्त सळसळवणारी ही घटना मांडताना प्रत्येक गोष्टीचा बारकाईनं विचार केल्याचं जाणवतं. जालियनवाला बागेनंतर भारतीय स्वातंत्र्यलढ्याला खरी धार चढली. यानंतर येणारी दालनं आपल्याला याच लढ्याचा 'चित्रपट' दाखवतात. १९४२ चा स्वातंत्र्यलढा आपल्याला इथंच दिसतो... तुरुंगात झालेल्या जाळपोळीमुळे उद्विग्न झालेले गांधीजी आपल्याला इथंच भेटतात. एका भव्य भित्तीचित्र-शिल्पाद्वारे ही घटना आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते.

१९४७ साली, १४ आणि १५ ऑगस्टच्या मध्यरात्री देश स्वतंत्र झाला. पंडित जवाहरलाल नेहरूंनी लाल किल्ल्यावर तिरंगा फडकवला, त्यावेळी या यशस्वी स्वातंत्र्यलढ्याचे खरे नेते गांधीजी मात्र दिल्लीबाहेर होते. फाळणीमुळे दंगे उफाळण्यास सुरुवात झाली होती आणि ते शांत करण्यासाठी बापू बंगालमध्ये होते. विजयाचा झगमगाट त्यांना आपल्या कर्तव्यापासून ढळवू शकला नाही... त्यांची ही कृतिशील शिकवण आपल्याला खूप काही शिकवून जाते.

यानंतर येतो तो गांधीहत्येचा दिवस... नथूराम गोडसेनं प्रार्थना झाल्यावर गांधीजींवर दोन गोळ्या झाडल्या आणि देशाला स्वातंत्र्याचा प्रकाश देणारा हा सूर्य अस्ताला गेला. ही घटना रंगवून सांगण्याची निश्चितच नाही. याचं भान प्रदर्शनी करतानाही बाळगलेलं दिसतं. अत्यंत साधेपणानं चित्र आणि छायाचित्रांमधून ही घटना आपल्या डोळ्यापुढे येते. दालनातून बाहेर पडताना पंडितजींचे शब्द आपल्याला पुन्हा अंतर्मुख करतात. तसं अंतर्मुख होण्याची गरजही असते... कारण यापुढे आपण थेट वर्तमानकाळात जाणार असतो... भ्रष्टाचार, हिंसाचार, जातीय तणाव, धार्मिक विद्वेष या सामाजिक विकृती आजही जशाच्या तशा आहेत... त्यात बदल घडवायचा असेल, तर गांधीजींचे विचार किती आवश्यक आहेत याची खात्री पटते. या सगळ्या अंधकारातून आपल्याला अहिंसा आणि सत्य याचाच आधार मिळू शकतो, याचा शब्दातीत साक्षात्कार इथं आपल्याला होतो. आताच्या अंदाधुंदीच्या अंधारातून प्रकाशाकडे जात असताना आपण ज्या कमानीतून जातो, ती कमान म्हणजेच गांधीजी आहेत... प्रदर्शनाच्या शेवटच्या टप्प्यात लाईट इफेक्टच्या सहाय्यानं गांधीजींच्या प्रेरणेतून काम करणारी 'प्रकाशाची बेटं' आपल्याला दिसतात आणि यातलं एक बेट आपलंही असू शकतं, असं वाटून जातं...

### विचारऊर्जेचं रूपांतर विकासऊर्जेत...

शाळेमध्ये आपण ऊर्जा अक्षय्यतेचा नियम शिकलेला आहे... ऊर्जेची निर्मिती अथवा नाश करता येत नाही, एका ऊर्जेचं दुसऱ्या ऊर्जेत रूपांतर मात्र करता येतं... कमी-अधिक प्रमाणात ऊर्जा अक्षय्यतेचा हा नियम आपल्याला जैन हिल्सवरही बघायला मिळतो... भाऊ म्हणजे भंवरलाल जैन हे स्वतःला गांधीवादी म्हणत नाहीत... गांधीवादी असणं ही फार वरची पातळी आहे, आपण गांधी विचाराचे कार्यकर्ते आहोत, असंच ते आयुष्यभर विनयानं सांगत आले आहेत. जैन इरिगेशनमध्ये गांधीविचारांच्या भाऊंनी घेतलेल्या ऊर्जेचं रूपांतर विकासऊर्जेत झालेलं आपल्याला बघायला मिळतं...

'आपण या जगात आलो, त्यापेक्षा हे जग सोडताना अधिक सुंदर असायला हवं,' ही भाऊंची शिकवण आहे आणि जैन इरिगेशनच्या कार्यप्रणालीत त्यांनी हा विचार बिंबवला आहे. त्यामुळेच जे काम करायचं, ते नफा कमाविण्यासाठी नाही तर समाजासाठी हेच त्यांचं मुख्य ध्येय्य राहिलं आहे. भावी काळात माणसांना भेडसावू शकतील अशा तीन मुख्य समस्या आहेत. पहिली म्हणजे अर्थातच अन्न, दुसरी पाणी आणि तिसरी ऊर्जा... जैन इरिगेशन या तीनही क्षेत्रांमध्ये अतिशय मोलाचं काम करते आहे. गेली अनेक वर्षं पाणी नियोजनाच्या क्षेत्रात जैन इरिगेशनचं नाव जगात अग्रक्रमानं घेतलं जातं. जैन हिल्स इथं असलेल्या विविध प्रकल्पांच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात नवनवे प्रयोग केले जातात आणि शेतीतील उत्पादकता अधिकाधिक कशी वाढविता येईल, याचा विचार होतो... ऊर्जा क्षेत्रातही जैन यांनी अनेक नवे प्रयोग चालविले आहेत. विशेषतः अपारंपरिक किंवा कंपनीच्या भाषेत बोलायचं तर ग्रीन एनर्जी क्षेत्रात अनेक मोलाचं संशोधन होतंय आणि योगदान दिलं जातंय...

जैन हिल्सचा एक फेरफटका मारला, तर या लाखमोलाच्या कामाचा थोडाफार अंदाज आपल्याला येऊ शकेल... जैन ठिबकच्या माध्यमातून जलव्यवस्थापनात काम करताना उपलब्ध असलेल्या पर्यायांची एक लाईव्ह प्रदर्शनी इथं आहे. ड्रीपर्स, स्प्रिंक्लर्स यांचे अनेक नमुने आपल्याला इथं बघता येतात. महत्त्वाचं म्हणजे त्यांचं काम कसं चालतं हे इथं प्रत्यक्षात पाहता येतं आणि आपल्या गरजेनुसार शेतकरी त्यातून चांगला पर्याय स्वीकारू शकतात. शेतीसाठी वापरायच्या विविध अत्याधुनिक यंत्रांचंही तसंच... ही यंत्र प्रत्यक्षात कसं काम करतात, हे इथं पाहता येतं. अल्ट्रा हाय डेन्सिटी ही फलोत्पादनाची अत्याधुनिक पद्धत इथं आपल्याला प्रत्यक्षात पाहता येते. कमीत कमी जागेत जास्तीत जास्त फळझाडं लावून जास्तीत जास्त उत्पन्न घेता येतं, हे जैन हिल्सवर सप्रमाण सिद्ध झालंय. येत्या काळात बागायतदारांसाठी ही पद्धत म्हणजे एक मोठं वरदानच ठरणार आहे.

संशोधन हा विकासाचा मुख्य आधारस्तंभ असतो, असं म्हणतात... त्यामुळेच अत्यंत मूलगामी संशोधनावर जैन इरिगेशननं भर दिला आहे. देशात कोणाकडेच नाही, अशी अद्ययावत प्रयोगशाळा जैन हिल्सवर आहे. यामध्ये अनेक प्रकारचे जैविक आणि रासायनिक प्रयोग अहोरात्र सुरू असतात. या प्रयोगशाळेच्या बाजूलाच केवळ टिश्युकल्चरसाठी वाहिलेली दुसरी एक प्रयोगशाळाही आहे. रोपांचा दर्जा अधिक वाढावा आणि त्यातून दुप्पट उत्पन्न घेता यावं, यासाठी टिश्युकल्चरवर अनेक प्रयोग इथं होतात. टिश्युकल्चरच्या मदतीनं केळीची रोपं तयार करून उत्पन्न दुपटीनं वाढतं, हे इथंच सप्रमाण सिद्ध झालंय. त्यामुळे पूर्वी शेतकऱ्यांना ही रोपं घेण्यासाठी आर्जवं करावी लागत असताना आता या टिश्युकल्चर्ड रोपांसाठी चक्क वेटिंग लिस्ट असते... विविध फळझाडं आणि फुलझाडांवर असेच प्रयोग इथं सुरू आहेत.


ऊर्जेच्या क्षेत्रात एक मोठी क्रांतिकारी झेप जैन हिल्स घेत आहे. ८.५ मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प इथं आकाराला येतोय. येत्या चार पाच महिन्यांत त्याचं काम पूर्ण होईल. याखेरीज इथं असलेला बायोगॅस ऊर्जा प्रकल्प अनेकांना अनुकरणीय असाच आहे. अन्नप्रक्रियेतून राहणारा गाळ इंधन म्हणून वापरून त्यापासून वीज तयार करणारा हा पथदर्शी प्रकल्प आहे. अन्नप्रक्रिया उद्योग, साखर कारखाने, मोठ्या सोसायटी यांना अशा प्रकल्पांची निश्चितच मदत होऊ शकते. टाकावू जैविक कचऱ्याची विल्हेवाट आणि ऊर्जानिर्मिती असा दुहेरी फायदा देणारा हा ग्रीन एनर्जी प्रोजेक्ट आहे...

तात्पर्य काय, तर विचार आणि विकास अशा दोन्ही ऊर्जांचा स्रोत आपल्याला जळगावच्या जैन हिल्समध्ये बघायला मिळतो. गांधीजींच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन सुरू असलेलं काम आणि हे विचार भावी पिढीपर्यंत पोहोचावेत, यासाठी नव्या पिढीच्याच भाषेत केलेली गांधीविचारांची मांडणी हे दोन्ही थक्क करणारं आहे... मघाशी म्हटलं त्यानुसार या गोष्टींचं अचूक वर्णन केवळ शब्दांत करणं अशक्य आहे. छायाचित्रांची जोड घेऊनही याची प्रचिती देता येऊ शकत नाही... 'ही ओवी प्रत्यक्ष अनुभवण्याची आहे... त्यामुळे एकदा तरी जळगावला जाऊन या गांधीतीर्थाचं 'दर्शन' आपण घ्यायलाच हवं...' जैन हिल्सला भेट देणाऱ्या प्रत्येकाचं स्वागत तितक्याच आत्मियतेनं केलं जातं... मग तो एखादा उद्योगपती असो, राष्ट्रपती असोत की मणीपूर, मिझोराममधून आलेला एखादा छोटा शेतकरी... प्रत्येक बारीकसारीक काम, प्रत्येक गोष्टीतले सर्व पैलू तुम्हाला उलगडून दाखविताना इथं सर्वांनाच आनंद होतो... तितकाच, किंबहुना त्यापेक्षा जास्त आनंद आपल्याला ते बघताना होतो आणि परतीच्या वाटेवर आपण जैन हिल्स उतरत असलो, तरी वैचारिकदृष्ट्या जास्त प्रगल्भ आणि वरच्या पातळीवर गेलेलो असतो... मला खात्री आहे, की प्रत्येकाला तिथं असाच अनुभव येईल!

### मे चा अंक राखून ठेवा...

या लेखात जैन इरिगेशनच्या कृषी क्षेत्रातल्या कामाची केवळ तोंडओळख झाली आहे. पण एका लेखात किंवा एका अंकात बंदिस्त होऊ शकेल, असा हा विषय नाही. मे महिन्याचा 'अमृतवेल बिझनेस'चा अंक हा कृषी क्षेत्राला वाहिलेला असणार आहे. या अंकात जैन हिल्सवर सुरू असलेल्या विविध प्रयोगांची सविस्तर माहिती आम्ही देणार आहोत. त्यामुळे मे महिन्याचा अंक वाचकांनी राखून ठेवावा, असं आवाहन आम्ही इथं करत आहोत. तसंच अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात जैन इरिगेशन करत असलेल्या कामांबाबत कंपनीचे उपाध्यक्ष अशोक जैन यांचा सविस्तर लेख 'अमृतवेल बिझनेस'च्या या महिन्यातील, म्हणजे एप्रिलच्या अंकात समाविष्ट आहे, याची दखल घ्यावी.

संपादक




जळगावमध्ये आयोजित 'कृषी व्यवसायातून शेतकऱ्यांची उन्नती' या एकदिवसीय परिसंवादाच्या पहिल्या सत्रात मार्गदर्शन करताना हॉवर्ड बिझनेस स्कूलचे माजी डीन प्रा. रे गोल्डबर्ग. सोबत डीन नितीन नोहरिया, जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भंवरलाल जैन, डॉ. कस्तुरी रंगन, नियोजन आयोगाचे कृषी सल्लागार व्ही. व्ही. सदामते आदी.

# बी-गुरूंच्या नजरेतून कृषी व्यवसाय...

**मार्च महिन्यात जळगावच्या जैन इरिगेशननं एका परिसंवादाचं आयोजन केलं होतं. हा विषय तसा साधाच असला, तरी अतिशय महत्त्वाचा... कृषी व्यवसाय करताना आपल्या ग्राहकांची म्हणजेच शेतकऱ्यांची काळजी कशी घेतली जाऊ शकते याबाबत अनेक तज्ज्ञांनी मतं मांडली. हार्वर्ड बिझनेस स्कूलचे डीन आणि काही ज्येष्ठ प्राध्यापक, भारतासह विदेशातील कृषिक्षेत्राशी निगडित कंपन्यांचे उच्चपदस्थ या परिसंवादासाठी आणि जैन इरिगेशनचं काम समजून घेण्यासाठी खास जळगावला आले होते. या परिसंवादाचा हा इतिवृत्तांत...**

विशेष प्रतिनिधी
editor@amrutwelplus.com



परिसंवादात सहभागी झालेले अध्यासक, संशोधक व मान्यवर.

मार्च महिन्यात अर्थसंकल्पासोबत मीडियात चर्चेचा आणखी एक विषय होता तो गरिबीच्या व्याख्येचा... एकीकडे सरकार गरिबी हटविण्यासाठी करत असलेल्या प्रयत्नांची ग्वाही दिली जात असताना खऱ्या अर्थानं गरिबी हटवण्यासाठी रोजगार वाढविला पाहिजे, यावर अनेकांनी भर दिला. मात्र ही सगळी चर्चा सुरू होण्यापूर्वीच हार्वर्ड बिझनेस स्कूलचे डीन डॉ. नितीन नोहरिया यांनी हा विषय छेडला होता. निमित्त होतं जैन इरिगेशन आणि एंटरप्राईज सोल्युशन टू पॉवर्टी यांच्या संयुक्त विद्यमानं जळगावमध्ये झालेल्या 'कृषी व्यवसायातून शेतकऱ्यांची उन्नती' या विषयाच्या परिसंवादाचं...

डॉ. नोहरिया यांनी आपल्या भाषणात दारिद्र्य निर्मूलनासाठी कॉर्पोरेटचा कसा उपयोग होऊ शकतो याचं विवेचन केलं. ते म्हणाले की, दान देऊन किंवा मदत करून केलं जाणारं गरिबीचं उच्चाटन हे क्षणिक असतं... त्याउलट मोठमोठ्या कंपन्या रोजगार निर्माण करतात आणि लोकांना उत्पन्नाचं साधन उपलब्ध करून देतात. त्यामुळे दारिद्र्य कमी करण्यासाठी यांचं योगदान मोठं असतं. जैन इरिगेशनच्या कार्याबाबत गौरवोद्गार काढताना डॉ. नोहरिया म्हणाले, नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये पाणी हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. भारतीय शेतकऱ्यांना पाणी बचतीचा मंत्र देणाऱ्या जैन इरिगेशनचं जागतिक स्तरावर सुरू असलेलं कार्य, हा माझा प्रेरणास्रोत आहे. जागतिक पर्यावरणाच्या दृष्टीनं हे एक रोल मॉडेल असल्याचं ते म्हणाले...

आजमितीस जगाची लोकसंख्या ७ अब्जच्या घरात आहे. लवकरच ती ९ अब्ज होईल... या लोकांना अन्न पाहिजे. अन्न ही त्यांची सर्वात मूलभूत गरज आहे. जोपर्यंत आपण नावीन्यपूर्ण पद्धती वापरत नाही, तोपर्यंत आपण याला पुरे पडू शकणार नाही. पाश्चिमात्य देशांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरानं जास्त धान्य पिकविण्याचे प्रयोग होत आहेत. भारतात मात्र अद्याप तसं होताना दिसत नाही, अशी खंत डॉ. नोहरिया यांनी व्यक्त केली. इथल्या नैसर्गिक परिस्थितीला अनुरूप असे पर्याय शोधून काढणं ही काळाची गरज आहे. तसं झाल्यास जगातली वाढती अन्नाची मागणी पूर्ण करण्यास भारत समर्थ होईल, असं ते म्हणाले.

परिसंवादाला संबोधित करताना जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भंवरलाल जैन म्हणाले की, कोणत्याही व्यवसायाचा धर्म नफा कमावणं, हाच असला तरी यातून मोठी झालेली भांडवलशाही फार काळ तग धरून राहील, अशी परिस्थिती राहिलेली नाही. कृषी व्यवसायाच्या बाबतीत बोलायचं तर आपल्या ग्राहक शेतकऱ्यांच्या गरजा जाणून घेऊन त्याप्रमाणे कृती केली, तरच आपला टिकाव लागू शकेल. उपचारासाठी अमेरिकेत गेले असताना हार्वर्ड बिझनेस स्कूलला दिलेली भेट, तिथं माजी डीन प्रा. रे गोल्डबर्ग यांच्याशी झालेली सविस्तर चर्चा याची आठवण जैन यांनी आपल्या भाषणात सांगितली.



## कृषी व्यवसायाचं इंटरनॅशनल रोल मॉडेल...

जैन इरिगेशन या भंवरलाल जैन यांनी स्थापन केलेल्या कंपनीनं जगातल्या शेतीविषयक उद्योजकांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे, असे गौरवोद्गार हार्वर्ड विद्यापीठातल्या ज्येष्ठ प्राध्यापकांनी काढले... ७००० कर्मचारी असलेल्या या बलाढ्य उद्योग समूहात आपल्या ग्राहकांपासून ते पर्यावरणापर्यंत प्रत्येक गोष्टीचा सखोल विचार केला जातो... भारतीय शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचं महत्त्व पटवून आणि त्यासाठी परवडणाऱ्या दरात आपली उत्पादनं देऊन जैन इरिगेशननं हे सिद्ध केलं आहे. गोड्या पाण्याचे साठे कमी होत चालले असताना ठिबक सिंचनासारख्या उपायांनी कमीत कमी पाण्यात भरघोस पीक घेता येऊ शकतं, हे जैन यांच्या द्रष्टेपणामुळेच उजेडात आलं... अशाच प्रकारे प्रत्येक क्षेत्रात आपला वेगळा ठसा जैन इरिगेशननं उमटवला आहे आणि भविष्यातही यात खंड पडणार नाही, याची हमी या परिसंवादानं दिली आहे...

जैन इरिगेशन करत असलेल्या कामाचं डुप्लिकेशन, ट्रिप्लिकेशन झालं तर आपल्या पर्यावरणविषयक समस्या मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतात, असं प्रा. गोल्डबर्ग त्यांना म्हणाले होते. डॉ. नोहरिया, प्रा. गोल्डबर्ग यांच्यासारखे हार्वर्ड बिझनेस स्कूलमधील ज्येष्ठ प्राध्यापक कधी काळी जळगावात येतील, याची आपण कल्पनाच केली नव्हती, असं जैन यांनी विनयानं नमूद केलं.

भारतीय शेतकरी आणि कृषी उद्योगांपुढे असलेल्या समस्यांचा ऊहापोह करताना जैन म्हणाले की, सरकारने दोन पावलं पुढं येवून या क्षेत्रातील कंपन्यांशी, शेतकऱ्यांशी एक विश्वासार्ह वातावरण करणे गरजेचं झालं आहे. आम्हाला सरकारकडून मदत जरूर मिळते, पण परस्पर विश्वास निर्माण झाल्याखेरीज एकत्र येऊन एका उद्देशानं काम होऊ शकत नाही... मुळात सरकार आणि शेतकरी यांची उद्दिष्टं ही दीर्घकालीन नसल्याचा हा परिणाम असल्याचं जैन यांनी नमूद केलं.

अर्थशास्त्राप्रमाणेच धार्मिक ग्रंथांचाही अभ्यास असलेल्या डॉ. गोल्डबर्ग यांनी आध्यात्मिक उदाहरणं देत आदर्श अर्थकारण कसं असू शकतं, ते विषद केलं. एखादी सिस्टिम ही त्या सगळ्या सिस्टिमसाठी महत्त्वाची असली पाहिजे. केवळ काही घटकांचा फायदा करून देणारी कुठलीच यंत्रणा यशस्वी होऊ शकत नाही... याचं उदाहरण भारतातच, अमूल या सगळ्यात मोठ्या सहकारी संस्थेच्या रूपानं ते उभं असल्याचं डॉ. गोल्डबर्ग म्हणाले. आपण जोपर्यंत आपले ग्राहक आणि एकूण समाजासाठी काम करत नाही, तोपर्यंत आपल्याला व्यवसाय करण्याचा अधिकारच नाही. समाजासाठी काही करणं म्हणजे केवळ काही चांगली कामं किंवा दानधर्म करणं नाही... कंपन्यांच्या मूलभूत रचनेत बदल करून सर्वांसाठी विनविन परिस्थिती तयार केली गेली पाहिजे, असा त्यांच्या म्हणण्याचा अर्थ होता...

सध्या १२ व्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार होत आहे. येत्या दोनतीन महिन्यांत ही योजना प्रत्यक्षात अंमलात येण्याची शक्यता आहे... या पार्श्वभूमीवर नियोजन आयोगाचे कृषी सल्लागार व्ही. व्ही. सदामते यांनी या परिसंवादात मांडलेले विचारही नियोजनासाठी महत्त्वाचे आहेत. अशा प्रकारच्या परिषदांमुळे चांगलं मार्गदर्शन मिळते. जैन यांचं कार्य सरकार आणि बिगर सरकारी संस्थांसाठी नेहमीच प्रेरणादायी ठरणारं असल्याचं ते म्हणाले. नियोजन आयोग आणि कृषी मंत्रालयातला दांडगा अनुभव असलेल्या सदामते यांनी खासगीसरकारी भागीदारीतून या क्षेत्रात अधिक व्यापक बदल होऊ शकतात, असं मत मांडलं. पंचवार्षिक योजनेबाबत माहिती देताना ते म्हणाले की, ११व्या योजनेच्या तुलनेत यावेळी कृषी क्षेत्रासाठी भरीव आर्थिक तरतूद असेल. पण या क्षेत्राच्या विकासासाठी केवळ आर्थिक तरतुदी

करून भागणार नाही, हे गेल्या साडेसहा वर्षांच्या अनुभवाअंती माझ्या लक्षात आलं आहे... दिला जाणारा पैसा योग्य ठिकाणी खर्च होईल याची यंत्रणा तितक्याच सक्षमपणे राबवणं आवश्यक आहे. या परिसंवादात डॉ. कस्तुरी रंगन, अंजली रैना, नॅन्सी बेरी यांनीही कृषी व्यवसाय करताना शेतकऱ्यांच्या हितासाठी काय करता येऊ शकते, याची माहिती दिली.

या परिषदेसाठी गोदरेज उद्योग समूहाचे नादीर गोदरेज, अमूल इंडियाचे आर. एस. सोदी, बायरचे जॉन रेबिन, बिडकोचे विमल शाह, हिंदुस्थान कोकाकोलाचे पॅट्रिक यदूगा, आयटीसीचे एस. शिवकुमार, महिकोचे शिरिष बारवाले, महिंद्राचे विक्रम पुरी, शाम वेंबर, मदर डेअरीचे नागराजन शिवरामकृष्णन, नेस्ले इंडियाचे अँटोनियो वेंझिक, पेप्सीकोचे जयदीप भाटिया, रॅलीज्चे उमेश मेहेंदळे, टाटा केमिकल्सचे डी. के. सुंदर, केआरबीएलचे अशोक चांद, नामधारी सिडस्चे उदय सिंग, नाथ सिडस्चे नंदकिशोर कागलिया, न्यूजीवुड सिडस्चे रमेश विश्वनाथन, ओलामचे संजय संचेती, सिंजनटाचे अमित अग्रवाल, प्रकाश आपटे, मार्को फेरोनी यांच्यासह कृषी क्षेत्राशी संबंधित व्यवसाय करणारे अनेकजण उपस्थित होते. बेसिक्स कृषी, एक्झीन बँक, एचडीएफसी बँक, येस बँक, आयसीआयसीआय बँक, जम्मू आणि काश्मीर बँक, नाबार्ड, एसबीआय आदी अर्थपुरवठा संस्थांचे प्रमुख अधिकारीही यात सहभागी झाले होते. गुजरातचे कापूस उत्पादक भरत पटेल, हरियाणातले गहू उत्पादक गुरुमितसिंग, नेरळचे प्रगतिशील शेतकरी शेखर भडसावळे, वसंतराव महाजन, ऊस उत्पादक संजीव माने, तामिळनाडूतील केळी उत्पादक बागायतदार के. एन. सेल्वकुमार यांनी या परिषदेत सहभाग घेतला. यांच्यासोबतच या आंतरराष्ट्रीय परिसंवादात अनेक राज्यांमधून आलेल्या प्रगतिशील शेतकरी मोठ्या संख्येनं आपली उपस्थिती नोंदविली.

हा परिसंवाद कृषी व्यवसाय आणि त्याच्या सामाजिक उत्तरदायित्वावर प्रकाश पाडणारा ठरलाच; पण आंतरराष्ट्रीय पातळीवर हार्वर्ड बी स्कूलसारख्या पहिल्या क्रमांकाच्या व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थेनं भारतीय शेतकरी आणि त्यांच्या गरजांची दखल घेऊन त्यांचं जागतिक मापदंडांवर विवेचनही केलं. आगामी काळात या कार्यक्रमाचं फलित म्हणून बळीराजा अधिक समृद्ध व्हावा, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.

“

कल्पकता हे कोणत्याही समस्येवर उत्तर असू शकतं. कृषी व्यवसायांची भूमिका ही सर्वसमावेशक प्रगतीसाठी असली पाहिजेच... पण कमीत कमी नैसर्गिक संपत्तीचा उपयोग करण्यावरही त्यांचा मुख्य भर असायला हवा. त्यासाठी आपल्याला कल्पक व्हावं लागेल... पण प्रत्येक व्यवसाय हा एकटा कधीच नसतो. त्यातही कृषी उद्योगांचा समाज, सरकार यांच्याशी फार जवळचा संबंध असतो... श्रीयुत जैन म्हणाले तसं, ही थोडी गुंतागुंतीची प्रक्रिया असते... पण या बदलाच्या केंद्रस्थानी कृषी व्यवसाय निश्चितपणे राहू शकतो. किंबहुना बदलांचे अग्रदूत होण्याची संधी उद्योजकांनाच सर्वाधिक असते...

**डॉ. नितीन नोहरिया**
डीन, हार्वर्ड बिझनेस स्कूल

आत्ता प्रत्येक गोष्ट महाग होत असताना आम्ही कृषी उत्पन्नांच्या दराबाबत फारसे गंभीर कुठे आहोत? कारण आम्हाला भारतीय शेतकऱ्यांचं हित जपताना त्याच्या अर्थकारणावरही लक्ष द्यावे लागेल. भारतीय आणि विदेशी शेतकऱ्यांमध्ये क्रॉस सबसिडी करून हे करणं शक्य आहे... आपण अशा प्रकारे विचार करण्यात कमी पडतो. प्रत्येक शेतकरी हा एक उद्योजक मानल्यास शेती हे आपल्याकडचं सर्वात मोठं औद्योगिक क्षेत्र ठरेल. पण दुर्दैवानं आपण तसं करत नाही... कृषी क्षेत्राच्या उत्पन्नात घट होते किंवा अत्यल्प वाढ होते आहे, ही बाब आपण पुरेशी गांभीर्यानं घेत नाही...

**भंवरलाल जैन**
संस्थापक अध्यक्ष, जैन इरिगेशन

अमेरिकेतल्या एकदोन विद्यापीठांमध्ये मला खासगी सरकारी भागीदारीतल्या प्रकल्पांची मॉडेल्स पाहायला मिळाली. या उद्योगात अशा भागीदारीमुळे अधिक सक्षमता येऊ शकेल. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी दुष्काळी भागातल्या शेतकऱ्यांसाठी काय करता येऊ शकेल, यासंदर्भात एक बैठक बोलाविली होती. पंतप्रधान, अर्थमंत्री, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष यांच्यासह उद्योग क्षेत्रातले अनेकजण यात सहभागी झाले होते. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सरकार आणि खासगी उद्योजक अशा दोघांकडूनही पैसे गुंतवले गेले पाहिजेत, असा सारांश या बैठकीमधून निघाला... आम्ही या दिशेनं पावलं टाकायला सुरुवात केली आहे, याची मी तुम्हाला खात्री देतो...

**व्ही. व्ही. सदामते**
नियोजन आयोगाचे कृषी सल्लागार